# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 05/11/2015 रोजी (का.प.क्र.09) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

गुरूवार दिनांक 05 नोंव्हेबर 2015 (का.प.क्र.9) रोजी मा.सभापती श्री.दिलीप थोरात यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.45 वा.वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.प्रकाश महाजन, नगरसचिव श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
02. स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले
03. स.स.श्री.नितीन रमन चित्ते
04. स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
05. स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप
06. स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे
07. स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
08. स.स.श्री.विकास प्रकाश एडके
09. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
10. स.स.श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
11. स.स.श्री.खान इरशाद इब्राहीम
12. स.स.श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
13. स.स.श्रीमती शेख समीना इलियास
14. स.स.श्रीमती ज्योती राजाराम मोरे
15. स.स.श्रीमती रेश्मा अशपाक कुरैशी

श्री.मकरंद कुलकर्णी :क्रांतीचौक ते सिडको कॉर्नर पर्यत असलेल्या उड्डाण पुलाखालील जागा पार्कींगसाठी दिल्यास महापालिकेचे उत्पन्न वाढेल. या पुलाखाली अतिक्रमण होऊन तेथे अनेक लोक वास्तव्यात आहे.

मा.सभापती :या बाबत माहिती घेतली जाईल.

**<u>विषय क्र. 21 :</u>**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला गुलमंडी सुदर्शन मेडीकलसमोर वाहनतळासाठी कार्यालयीन जा.क्र./मनपा/मामअ/2015/154 दिनांक 08/07/2015 अन्वये वृत्तपत्रात जाहिर प्रगटन देऊन निविदा मागविण्यात आल्या असता सदर वाहनतळाच्या एकुण-9 निविदा विक्री करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी एकुण 6 निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदा उपआयुक्त (मालमत्ता), मुख्य लेखा अधिकारी व लेखाधिकारी यांचे समक्ष दि.04/08/2015 रोजी उघडण्यात आल्या, त्याचे दर खालीलप्रमाणे.

**गुलमंडी सुदर्शन मेडीकल समोरील वाहनतळ**

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | प्रतिमाह आधारभुत रक्कम रूपये | प्रतिमाह प्राप्त निविदा दर रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| 01. | श्री.आतिष भगवानराव जोजारे | 16500/- | 35,001/- |
| 02. | श्री.संजय सदानंद पाटोळे | 16500/- | 33,000/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 03. | श्री.पंकज धनराज बजाज | 16500/- | 31,000/- |
| 04. | श्री.विनोद सुभाष बेदमुथा | 16500/- | 21610/- |
| 05. | श्री.गणेश राधाकिसन इंगळे | 16500/- | 21,121/- |
| 06. | श्री.कपिल चंदनलाल जैस्वाल | 16500/- | 20,000/- |

उपरोक्त सदर वाहनतळाकरीता एकुण सहा निविदा प्राप्त झालेल्या असून तुलनात्मक दरांचा तक्ता पाहता सर्वात जास्त दराची निविदा रक्कम रू.35001/- प्रतिमाह असून निविदा श्री.आतिष भगवानराव जोजारे यांचे आहेत.

करीता त्यांची निविदा मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. मान्यता झाल्यास संबंधीताकडून करारनामा करून घेऊन कार्यादेश देण्यात येईल.

श्री.गजानन बारवाल : गुलमंडी येथे पार्कींगची गरज आहे. या प्रस्तावानुसार किती स्क्वेअर फुट जागा देणार आहे.

उपआयुक्त-मालमत्ता :जे स्मारक आहे तेथे चौरस बॉन्ड्री केली त्यामधील जागा देत आहोत.

श्री.गजानन बारवाल :योग्य प्रकारे जागा तेथे सोडायला पाहिजे. हातगाडया, रिक्षा उभ्या असतात नागरीकांना जा-ये करण्यासाठी जागा पाहिजे.

मा.सभापती :स.सदस्यांची सूचना लक्षात घेऊन कार्यवाही करावी विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला गुलमंडी सुदर्शन मेडीकलसमोर वाहनतळासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात जास्त म्हणजेच र.रू.35001/- प्रतिमाह दराची श्री.आतिष भगवानराव जोजारे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 22 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला नागेश्वरवाडी वाहनतळासाठी कार्यालयीन जा.क्र./मनपा/मामअ/2015/154 दिनांक 08/07/2015 अन्वये वृत्तपत्रात जाहिर प्रगटन देऊन निविदा मागविण्यात आल्या असता सदर वाहनतळाच्या एकुण-3 निविदांची विक्री झाली. सदर तीनही निविदा प्राप्त झाल्या असून, ह्या निविदा उपआयुक्त (मालमत्ता), मुख्य लेखा अधिकारी व लेखाधिकारी यांचे समक्ष दि.04/08/2015 रोजी उघडण्यात आल्या, त्याचे दर खालीलप्रमाणे.

**नागेश्वरवाडी वाहनतळासाठी**

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | प्रतिमाह प्राप्त निविदा दर रक्कम रूपये |
|---|---|---|
| 01. | श्री.विजयानंद रामलाल यादव | 6700/- |
| 02. | श्री.गजानन रामलाल यादव | 4500/- |
| 03. | श्री.राहुल जवाहरलाल यादव | 4000/- |

उपरोक्त सदर वाहनतळाकरीता एकुण तीन निविदा प्राप्त झालेल्या असून तुलनात्मक दरांचा तक्ता पाहता सर्वात जास्त दराची निविदा रक्कम रू.6700/- प्रतिमाह असून निविदा श्री.विजयानंद रामलाल यादव यांची आहेत.

करीता त्यांची निविदा मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. मान्यता झाल्यास संबंधीताकडून करारनामा करून घेऊन कार्यादेश देण्यात येईल.

श्री.गजानन बारवाल : हा विषय वाहनतळाचा आहे. किती जागा सोडणार आहे.

उपआयुक्त -मालमत्ता :मार्कीग करून घेतली जाईल.टू-व्हिलर साठी हे असणार आहे चारचाकी वाहन क्वचीत असतील.

मा.सभापती :व्यवस्थित मार्कींग करावी अडथळा येणार नाही अशी कार्यवाही करावी. तसे ठेकेदारास सांगावे व त्याप्रमाणे करारनामा करून घ्यावा. विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला नागेश्वरवाडी वाहनतळासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात जास्त म्हणजेच र.रू.6700/- प्रतिमाह दराची श्री.विजयानंद रामलाल यादव यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 23 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला उस्मानपुरा संत एकनाथ रंगमंदिर लगत (तळघर) वाहनतळासाठी कार्यालयीन जा.क्र./मनपा/मामअ/2015/154 दिनांक 08/07/2015 अन्वये वृत्तपत्रात जाहिर प्रगटन देऊन निविदा मागविण्यात आल्या असता, सदर वाहनतळाच्या एकुण-6 निविदांची विक्री करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी एकूण-4 निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदा उपआयुक्त (मालमत्ता), मुख्य लेखा अधिकारी व लेखाधिकारी यांचे समक्ष दि.04/08/2015 रोजी उघडण्यात आल्या, त्याचे दर खालीलप्रमाणे.

**उस्मानपुरा संत एकनाथ रंगमंदिर लगत (तळघर) वाहनतळासाठी.**

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | प्रतिमाह प्राप्त निविदा दर रक्कम रूपये |
|---|---|---|
| 01. | श्री.विनोद सुभाष बेदमुथा | 7300/- |
| 02. | श्री.प्रमोद भिमराव कोथमिरे | 2100/- |
| 03. | श्री.किरण कचरू केदारे | 1550/- |
| 04. | श्री.शरद दिगंबर कोथमिरे | 500/- |

उपरोक्त वाहनतळाकरीता एकुण चार निविदा प्राप्त झालेल्या असून तुलनात्मक दरांचा तक्ता पाहता सर्वात जास्त दराची निविदा रक्कम रू.7300/- प्रतिमाह असून निविदा श्री.विनोद सुभाष बेदमुथा यांची आहे.

करीता त्यांची निविदा मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. मान्यता झाल्यास संबंधीताकडून करारनामा करून घेऊन कार्यादेश देण्यात येईल.

श्री.गजानन बारवाल :या जागेचा योग्य प्रकारे उपयोग होत नाही. आता उपयोगात आणावे.

उपआयुक्त-मालमत्ता :यावर्षीपासून उपयोग करीत आहे. मागे पे ॲण्ड पार्क म्हणून बोर्ड लावलेला होता टू-व्हिलर पार्कींग आहे.

मा.सभापती :व्यवस्थीत उपयोग होईल त्याप्रमाणे कार्यवाही करावी विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला उस्मानपुरा संत एकनाथ रंगमंदिर लगत (तळघर) वाहनतळासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात जास्त म्हणजेच र.रू.7300/- प्रतिमाह दराची श्री.विनोद सुभाष बेदमुथा यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 24 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका अधिनस्त 12 माध्यमिक शाळांमधुन निवडक गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना त्यांच्या अंगभुत गुणांना वाव देण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या प्रतिभा प्रगल्भ करण्यासाठी, शैक्षणिक सहली आयोजीत करून अनुभव देणे गरजेचे आहे. शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहलीसाठी अहमदाबाद येथील कांकरीया लेक येथे विद्यार्थ्यांच्या प्रतिभा फुलविण्यासाठी गुजरात सरकारने शालेय विद्यार्थ्यांच्या सहलीसाठी शासकीय कार्यालये, लोकशाही व्यवस्थापन, संशोधन संस्था, मोठे उद्योग यांच्या प्रतिकृती तयार केल्या असून त्याचे प्रत्यक्ष कामकाज कसे चालते हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सहभागातून अनुभवता येते. यासाठी मनपा अधिनस्त 12 माध्यमिक शाळांमधील इ. 8 ते 10 या वर्गातील प्रत्येक शाळेतून 10

गुणवत्ताधारक विद्यार्थी निवडून एकुण 120 विद्यार्थ्यांसाठी ही शैक्षणिक सहल आयोजीत करणे आवश्यक आहे. सहलीचे नियोजन करतांना विद्यार्थ्यांची सुरक्षितता ठेवणेसाठी व तातडीच्या आरोग्य सुविधेसाठी प्रथमोपचार पेटी व प्रथमोपचार तज्ञही सोबत ठेवण्यात येणार आहे. सदर शैक्षणिक सहलीसाठी प्रवास भाडे व अन्य खर्चापोटी अंदाजे रू.5 लक्ष खर्च येणार आहे.

तरी या प्रस्तावित शैक्षणिक सहलीस व सहलीपोटी येणारा खर्च रू.5 लक्ष अंदाजीत खर्चाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल :विषय मंजूर करावा परंतु संकल्प कशा प्रकारचा माहिती दयावी.

मुख्य पशुसंवर्धन अधि. :ऑगस्ट च्या शेवटच्या आठवडयात प्राणी संग्रहालयाचा मास्टर प्लॅनींग ऑफ झू ॲण्ड इटसी इक्व्हीटेशन या विषयावर कांगरीया झूमध्ये बैठक होती गुजरात मध्ये माध्यमिक प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना शिक्षक सहलीला घेऊन आले होते त्यांनी म्हटले की विदयार्थ्यासाठी ही सहल कम्पलसरी केली.कांक्रीया लेखला भेट दिली. 20-25 मॉडेल केले बँकेची प्रतिकृती ठेवली एटीएम,व बँकेचे व्यवहार कसे ऑपरेट करायचे राज्य व लोकसभा तसेच विधानसभेचे कामकाज कसे चालते हे प्रत्यक्ष विदयार्थ्यांना करून पाहता येते. शास्त्रज्ञ काय करतात हे माहिती दिली जाते.गुजरात सरकारने त्या शाळांना कंम्पलसरी केले. या संदर्भात मा.सभापती यांचेशी चर्चा केली. मुलाच्या आरोग्याची काळजी घेतली जाईल यात नमूद केले. मेट्रोसिटी व मेघा मशीनचा अनुभव यातून गरीब विदयार्थ्याना मिळणार आहे.प्रगतीशिल नागरीक होण्यासाठी ही सहल करणे योग्य व आवश्यक आहे.

या वेळी मा.आयुक्त श्री. प्रकाश महाजन हे सभागृहात आगमन करतात.

श्री.अब्दुल नाईकवाडी :फक्त गुणवंत विदयार्थ्यासाठीच हे आहेत का?

मुख्य पशुसंवर्धन अधि. :जास्तीत जास्त विदयार्थी नेण्याचा प्रयत्न राहिल खर्चाचापण विचार करावा लागेल.

श्री.अब्दुल नाईकवाडी :फक्त गुणवंत विदयार्थ्यांचाच विचार न करता सरसकट सर्वच विदयार्थ्यांना सहलीसाठी घेऊन जावे.

मा.सभापती :गुणवत्ता यादी कशी ठरवायची आपण ठरवावे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :चिठ्ठया टाकून विदयार्थी निवडावे.

मा.सभापती :आर्थीक परीस्थिती विचारात घेवून तसेच भेदभाव न होता एका वर्गातून 10 विदयार्थी ड्रॉ पध्दतीने निवडावे कुणावरही अन्याय होणार नाही.

मा.आयुक्त :विदयार्थ्यांना एक्स्पोजल मिळण्यासाठी संधी आहे. कोणती शाळा चांगली, कोणत्या देशामध्ये कोणती व किती स्कॉलरशीप मिळते या युगात विदयार्थी इन्टरनेटवर माहिती काढतात. मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पुढाकारातून ही संस्था कार्यान्वित आहे. वेगवेगळया संस्था असतात ऑर्गनाईजेशनमध्ये पुढे जाऊन कसे कोर्स असतात तेथे एक मॉडेल आहे व मनपाच्या विदयार्थ्यांना तेथे एक्स्पोजल मिळावे मनपाच्या वतीने घेऊन गेल्यास त्या विदयार्थ्याचे चांगले करीयर घडेल व योगदान करू शकू सुचना केल्यानुसार ड्रॉ पध्दतीने निवड करता येईल मुलींना सुध्दा संधी देता येईल.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी :मुलींना या सहलीसाठी समावेश करणार असाल तर माझे या महिन्याचे मानधन देण्यास सम्मती आहे.

मा.सभापती : स.सदस्यांनी केलेल्या सूचनेनुसार शैक्षणिक सहलीसाठी मनपाच्या माध्यमिक शाळेमधुन विद्यार्थ्यांची निवड करतांना कुठल्याही विद्यार्थ्यासोबत दुजाभाव होऊ नये म्हणुन प्रत्येक शाळेमधुन ड्रॉ पध्दतीने विद्यार्थ्याची निवड करावी अशा दुरूस्तीसह प्रस्तावास मान्यता देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका अधिनस्त 12 माध्यमिक शाळेतील इ. 8 ते 10 या वर्गातील एकूण 120 निवडक गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना त्यांच्या अंगभुत गुणांना वाव देण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या प्रतिभा प्रगल्भ करण्यासाठी, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहलीसाठी अहमदाबाद येथील कांकरीया लेक येथे सहल आयोजीत करणेस आणि सहलीचे नियोजन करतांना विद्यार्थ्यांची सुरक्षितता ठेवणेसाठी व तातडीच्या आरोग्य सुविधेसाठी प्रथमोपचार पेटी व प्रथमोपचार तज्ञही सोबत ठेवणेस आणि सहलीसाठी येणाऱ्या र.रू.5 लक्षच्या अंदाजीत खर्चासह मंजुरी देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार शैक्षणिक सहलीसाठी मनपाच्या माध्यमिक शाळेमधुन विद्यार्थ्यांची निवड करतांना कुठल्याही विद्यार्थ्यासोबत दुजाभाव होऊ नये म्हणुन प्रत्येक शाळेमधुन ड्रॉ पध्दतीने विद्यार्थ्याची निवड करावी, अशा दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 25 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, श्री.उत्तम बाबुराव खोमणे, मजुर, पाणी पुरवठा विभाग (जायकवाडी) यांनी त्यांच्या स्वतःच्या Intracerebred Haemourhage with Middine shift with emergency temporal eranietomoy with evaluation of ICH(Severe Haemourhage) या उपचारा करीता रक्कम रू.1,00,000/- (अक्षरी रू.एक लक्ष फक्त) अग्रीम म्हणून दुनाखे हॉस्पिटल प्रा.लि.औरंगाबाद यांच्या नांवे अदा करण्यात आले होते. संबधित कर्मचाऱ्यानी त्यांच्या स्वतःच्या औषधोपचारासाठी रू.3,45,186/- (अक्षरी रु.तीन लक्ष पंचेचाळीस हजार एकशे शहांशी फक्त) इतका खर्च केलेला आहे. श्री.उत्तम बाबुराव खोमणे यांनी, खर्च केलेल्या रू.3,45,186/-(अक्षरी रु.तीन लक्ष पंचेचाळीस हजार एकशे शहांशी फक्त) रकमेपैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.1,03,513/- वजा जाता रु.2,41,673/-(अक्षरी रू.दोन लक्ष एकेचाळीस हजार सहाशे त्र्याहत्तर फक्त) येते. अनुज्ञेय रकमेच्या 90% रक्कम रु.2,17,506/- (अक्षरी रु.दोन लक्ष सतरा हजार पाचशे सहा मात्र) इतकी आहे. त्यामधून एकत्रित दाखल केलेला खर्च देयकाच्या 5% रक्कम रु.17,259/- (अक्षरी रु सतरा हजार दोनशे एकोणसाठ फक्त) मनपा फंडात जमा करणे आवश्यक आहे. संबंधिताच्या नांवे असलेल्या अग्रिम रक्कम रू.1,00,000/- (अक्षरी रू.एक लक्ष फक्त) रकमेसह रक्कम रु.2,00,247/- (अक्षरी रु.दोन लक्ष दोनशे सत्तेचाळीस मात्र) एवढया वैद्यकिय खर्चास मंजुरी होणे आवश्यक आहे. तसेच संबंधितांना अदा केलेले अग्रिम र.रु.1,00,000/- मनपा फंडात वळते करुन अग्रिम समायोजन मान्य करुन उर्वरीत रक्कम रु.1,00,247/- संबंधितास अदा करण्याच्या मान्यतेस्तव मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर.

श्री.गजानन बारवाल :यापुर्वीचे अनेक कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय देयकाचे प्रस्ताव प्रलंबीत आहे हा एकच प्रस्ताव का आला.

आरोग्य वैद्य.अधिकारी :पुर्वीचे प्रलंबीत प्रस्तावावर अभ्यास करून निकाली काढले जाईल यास मंजूरी देण्यास हरकत नसावी.

मा.सभापती :असे किती प्रस्ताव प्रलंबीत आहे माहिती घ्यावी.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी :सर्व कर्मचा-यांचे पीएफ, ईएसआय भरणा केले जाते का? सेन्ट्रल गव्हरमेंन्टची स्कीम आहे त्याचा फायदा द्यावा, 1 लक्ष ऐवजी 3 लक्ष खर्च दाखवला जातो. सिग्मा हॉस्पीटलमध्ये एक रूग्णास घेऊन गेलो होतो 1 ते 1.50 लक्ष खर्च झाला परंतु येथे प्रस्ताव 3 ते 4 लक्ष खर्चाचे येतात, चौकशी व्हावी.

आरोग्य वैद्य.अधिकारी :प्रत्येक रूग्णाची टेस्ट व ट्रीटमेंन्ट वेगळी असते.यावर अभ्यास करून सादर केले जाते हा खर्च संयुक्तीक आहे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :एन्जोग्राफी साठी 5 हजार लागतात येथे 20 हजार दाखवितात. स्टेनचा खर्च 50 हजार दाखवितात बायपास सर्जरी केली व 1,2 ब्लॉकेज असेल तरी 1.50 लक्ष

पेक्षा जास्त खर्च येत नाही.येथे 4-5 लक्ष खर्च दाखविला जातो किती ब्लॉकेज काढले संचिका दाखवावी.माझ्या माहिती प्रमाणे एवढा खर्च येत नाही. कर्मचाऱ्यांच्या उपचारासाठी एक ठराविक हॉस्पीटलचे पॅनल नेमावे.

आरोग्य वैद्य.अधिकारी :हॉस्पीटलचे पॅनल करता येईल.

श्री.अब्दुल नाईकवाडी :प्रस्तावास विरोध नाही हॉस्पीटकडून कोटेशन मागवावे.त्याप्रमाणे ठराविक हॉस्पीटलमध्ये उपचार घेतले जावे खर्च कमी लागेल.

मा.सभापती :चांगले हॉस्पीटलचे पॅनल तयार करावे. आजाराचे रेट निश्चित करावे व यापुढे त्याच हॉस्पीटल मधे महापालिकेचे कर्मचारी यांनी उपचार घ्यावे व देयके सादर करावीत. हा विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.उत्तम बाबुराव खोमणे, मजुर, पाणी पुरवठा विभाग (जायकवाडी) यांनी त्यांच्या स्वत:च्या Intracerebred Haemourhage with Middine shift with emergency temporal eranietomoy with evaluation of ICH(Severe Haemourhage) या उपचारा करीता संबधित कर्मचाऱ्यानी त्यांच्या स्वत:च्या औषधोपचारासाठी रू.3,45,186/-(अक्षरी रु.तीन लक्ष पंचेचाळीस हजार एकशे शहांशी फक्त) इतका खर्च केलेला असल्यामुळे, खर्च केलेल्या रू.3,45,186/- (अक्षरी रु.तीन लक्ष पंचेचाळीस हजार एकशे शहांशी फक्त) रकमेपैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.1,03,513/- वजा जाता रु.2,41,673/-(अक्षरी रू.दोन लक्ष एकेचाळीस हजार सहाशे त्र्याहत्तर फक्त) व अनुज्ञेय रकमेच्या 90% रक्कम रु.2,17,506/- (अक्षरी रु.दोन लक्ष सतरा हजार पाचशे सहा मात्र) तसेच त्यामधून एकत्रित दाखल केलेला खर्च देयकाच्या 5% रक्कम रु.17,259/- (अक्षरी रु सतरा हजार दोनशे एकोणसाठ फक्त) मनपा फंडात जमा करून आणि संबंधिताच्या नांवे असलेल्या अग्रिम रक्कम रू.1,00,000/- (अक्षरी रू.एक लक्ष फक्त) रकमेसह रक्कम रु.2,00,247/- (अक्षरी रु.दोन लक्ष दोनशे सत्तेचाळीस मात्र) एवढया वैद्यकिय खर्चास मंजुरी देण्यांत येते. तसेच संबंधितांना अदा केलेले अग्रिम र.रु.1,00,000/- मनपा फंडात वळते करुन उर्वरीत रक्कम रु.1,00,247/- संबंधितास अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.गजानन बारवाल :मा.आयुक्ताच्या बाबतीत सर्वसाधारण सभेने अविश्वास ठराव मंजूर केला असतांना ते आज सभागृहात उपस्थित आहे हे कितपत योग्य आहे.असे होत असेल तर विनंती सभा तहकूब करावी.

मा.सभापती :ठराव मंजूर केला असेल तरी विदयमान आयुक्त श्री.प्रकाश महाजन हेच आहे. त्यांचे ठरावा संबधी शासन स्तरावर निर्णय होईल.

श्री.गजानन बारवाल :मी प्रश्न केला तो योग्य नाही का आमच्या भावनेचा विचार करावा. सभा तहकूब करावी नसता आयुक्ताना येथे बसण्यास मनाई करावी.

श्री.मोहन मेघावाले : बहुमताने ठराव मंजूर केला नियमाने आयुक्त सभागृहात बसू शकतात का? जर ते बसणार असतील तर सभा तहकूब करावी.

श्री.गजानन बारवाल :सभागृहात आरोप प्रत्यारोप केले ते योग्य की अयोग्य या बाबतीत माहिती दिली नाही.

मा.सभापती :बहूमताने ठराव मंजूर केला शासनाकडे दिलेला आहे शासन जो निर्णय घेईल त्यानुसार कार्यवाही होईल.

श्री.गजानन मनगटे :अर्थसंल्पीय बैठकी शिवाय इतर स्थायी समितीच्या बैठकीला मा.आयुक्त उपस्थित राहत नव्हते आज उपस्थित राहण्याची काय आवश्यकता वाटली.

मा.सभापती :10 मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते.

(वेळ 12-15 वा. पुन्हा 12-55 वा.सभेला सुरूवात)

श्रीमती समीना शेख :आयुक्तांच्या बाबतीत अविश्वास ठराव मंजूर केला ते सभेला उपस्थित आहे येथे बसू शकतात की नाही विधी सल्लागार यांचा खुलासा घेण्यात यावा.

श्री.नितीन चित्ते :महापालिकेची निवडणुक होऊन 8 महिणे झाले,चांगल्या वाईट गोष्टी घडल्या. आम्ही सदस्य वैयक्तिक कुणाशी माडंण नाही.एकमेकांच्या विरोधात मतभेद असू शकतात.जे चालले ते विकासाच्या दृष्टीने चांगले नाही.यात आता सुधारणा व्हावी स्मार्ट सिटी साठी अधिकारी पदाधिकारी यांनी काय केले पाहिजे. जेथे चुक होते ती दाखविणे आमचे काम आहे चांगले काम करणे अधिकारी यांचे कर्तव्य असते. स्वतःच्या आकासापोटी काही विभागाकडून सदस्यांना त्रास देणे टारगेट करणे नोटीसा पाठविणे हे थांबविले जावे. सामान्य जनतेसाठी आम्ही प्रश्न करतो. आयुक्ताना पाठविण्याचा ठराव घेतला शासनाकडे पाठविला.त्यांना बैठकीत बसण्याचे अधिकार आहे की नाही माहिती घ्यावी.

श्री.मोहन मेघावाले :सिध्दार्थनगर भागातील रस्त्याचे काम पुर्ण होत नाही मोठी ट्राफिक तेथे असते. बाजूला उर्दु शाळा,गोदावरी शाळा आहे.काम होत नसेल व वारंवार बोलावे लागत असेल तर योग्य नाही.माझ्या वार्डात पाईपलाईनचे उदघाटन केले काम केले नाही.यात महापालिकेचे अधिकारी यांचीही चूक आहे समांतरचे लोक नवीन आहे त्यांना कामाचे समजत नाही मनपाचे अधिकारी सोबत राहून मेजर प्रॉब्लेम असेल ते सोडून कामे करावीत मा.आयुक्ताच्या बाबतीत ठराव घेतला 20 आरोप केले होते त्याचाही खुलासा करावा.

श्री.विकास एडके :आयुक्ताच्या बाबतीत अविश्वास ठराव मंजूर केला ते आज सभागृहात बसू शकतात की नाही. खुलासा घ्यावा.

श्री.गजानन बारवाल :ठराव मंजूर केला जे प्रश्न केले होते त्याचा उहापोह व्हावा जो निर्णय सभागृहाने घेतला त्याविषयी काय कार्यवाही केली.

विधी सल्लागार :महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 3 मध्ये स्थायी समिती व परिवहन समिती किंवा अन्य संस्था यांचे जसे कामकाज चालते त्याचे प्रोसीडींग सबंधी नियमावलीमध्ये तरतूद केली 43 मध्ये सेक्शन चार मध्ये आयुक्तास स्थायी समितीच्या किंवा उपसमितीच्या सभेत उपस्थित राहण्याचा तीत होणा-या चर्चेत भाग घेण्याचा उक्त समितीच्या सदस्याला जो अधिकार असतो तोच अधिकार असेल परंतु त्यास अशा सभेत कोणत्याही प्रस्तावावर मत देण्याची किंवा प्रस्ताव मांडण्याची मोकळीक असणार नाही. सेक्शन 5 मध्ये जर आयुक्त उपस्थित राहू शकत नसतील तर त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांना सभेत उपस्थित व चर्चेत भाग घेण्याचा अधिकार आहे.

मा.सभापती :मा.आयुक्ताचे या विषयी काय मत आहे खुलासा करावा.

मा.आयुक्त :मला या सभेत उपस्थित राहण्याचा अधिकार आहे जर आयुक्तास या सभेत उपस्थित राहता येत नसेल तर अति.आयुक्त किंवा उपआयुक्त यांना आयुक्ताचे प्रतिनिधी प्राधिकृत केल्यास ते सभेत उपस्थित राहू शकतात व चर्चेत भाग घेऊ शकता.ही कायदयात प्रोव्हीजन आहे. आयुक्ताना परत पाठविण्याचा जो ठराव मंजूर केला त्यानुसार शेक्शन 36 -3 नुसार सभागृहाला अधिकार आहे.जो ठराव घेतला त्याचा आदर करतो परंतु यावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार शासनाला आहे शासन जो निर्णय घेईल तो मला मान्य राहिल.

श्री.गजानन बारवाल :शासनाकडून या विषयी काही माहिती आली काय?

मा.सभापती :शासनाकडून काहीही माहिती आली नाही.

**विषय क्र. 26 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, श्रीमती काझी निशांत अंजुम सह-शिक्षिका केंद्रिय प्राथमिक शाळा इंदिरानगर बायजीपुरा यांनी या कार्यालयास दि.19/03/2015 रोजी विनंती अर्जाद्वारे त्यांचे स्वत:चे कर्करोगाचे वैद्यकीय उपचारार्थ रक्कम रू.3,86,433/- इतका खर्च झालेला असून तो कार्यालयामार्फत देण्याची मागणी अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांचे पुर्ततेसह केली आहे.

संबंधीतांनी कर्करोगाचे उपचार घेतलेले सिग्मा हॉस्पीटल, औरंगाबाद हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.वेखप्र/2011/प्र.क्र.333/11 सकावी 2 मंत्रालय, मुंबई-32 दि.16/11/2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट अ शासकीय कर्मचारी/कुटूंबीयांनी खाजगी रूग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रूग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रूग्णालयांची अद्यावत यादी दि.16/11/2011 पर्यंत व शासन परिपत्रक क्र. वैराप-2013/ प्र.क्र.281/13 राकावि.2 दि.11/10/2013 मधील प्रसिध्द रूग्णालयाच्या यादीत सदरील रूग्णालयाचे नाव समाविष्ठ आहे.

त्यानुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका यांनी प्रस्ताव पडताळणी अंती केलेल्या शिफारशीनुसार वैद्यकीय उपचारार्थ आलेला एकूण खर्च रू.3,86,433/- असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.54,346/- वजा जाता रू.3,32,087/- च्या 90 % रू.2,98,878/- इतकी होते. एकूण खर्चाच्या 5% रक्कम रू.19,322/- महानगरपालिका फंडात जमा करता संबंधीतास निव्वळ रक्कम रू.2,79,556/- देय ठरते.

वैद्यकीय खर्च रक्कम रू.2.00 लक्षच्या वरील रक्कमेच्या अदाईस मा.स्थायी समितीची मान्यता आवश्यक असल्याने श्रीमती काझी निशांत अंजुम, सहशिक्षिका यांना कर्करोग वैद्यकिय उपचारार्थ देय रक्कम रू.2,79,556/- (दोन लक्ष एकोणऐंशी हजार पाचशे छपन्न) प्रदान करणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती :वैद्यकीय खर्चाचा विषय आहे, मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती काझी निशांत अंजुम सह-शिक्षिका केंद्रिय प्राथमिक शाळा इंदिरानगर बायजीपुरा यांनी त्यांचे स्वत:चे कर्करोगाचे वैद्यकीय उपचारार्थ रक्कम रू.3,86,433/- इतका खर्च केलेला असल्यामुळे, वैद्यकीय उपचारार्थ आलेल्या एकूण खर्च रू.3,86,433/- त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.54,346/- वजा जाता रू.3,32,087/- च्या 90 % रू.2,98,878/- इतकी इतकी होत असल्यामुळे, एकूण खर्चाच्या 5% रक्कम रू.19,322/- महानगरपालिका फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.2,79,556/- (दोन लक्ष एकोणऐंशी हजार पाचशे छपन्न) संबंधीतास अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 27 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, अदालत रोडवरील आय.सी.सी.आय. बँक ते अशोका हॉटेल पर्यंतच्या मुख्य रस्त्यालगत असलेल्या वाहनतळासाठी कार्यालयीन जा.क्र./मनपा/मामअ/2015/154, दि.08/07/2015 अन्वये वृत्तपत्रात जाहिर प्रगटन देऊन निविदा मागविण्यात आल्या असता सदर वाहनतळाच्या एकूण-11 निविदा विक्री करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी एकूण 6 निविदा प्राप्त झालेले असून यापैकी अ.क्र.6 च्या निविदे सोबत अनामत रक्कमेचा डी.डी. नसल्याने निविदा उघडण्यात आलेली नाही व सदर पाच निविदा उपआयुक्त (मालमत्ता), मुख्यलेखाधिकारी यांचे समक्ष दि.04/08/2015 रोजी उघडण्यात आल्या त्याचे दर खालीलप्रमाणे.

**अदालत रोडवरील वाहनतळासाठी :**

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | प्राप्त निविदा दर | अनामत रक्कमेचा डी.डी./ पावती क्र. |
|---|---|---|---|
| 01. | श्री.संतोष अनंतराव जगताप | 36,770/- | डी.डी. क्र.238976 रू.10,000/- Bank of Maharashtra |
| 02. | श्री.नितीन भागिनाथ घुसळे | 30,555/- | डी.डी. क्र.393160 रू.10,000/- The Karnataka Bank Limited |
| 03. | श्री.विनोद सुभाष बेदमुथा | 24,670/- | डी.डी. क्र.830747 रू.10,000/- HDFC Bank |
| 04. | श्री.विजय मुरलीधर डोळस | 18,350/- | डी.डी. क्र.372810 रू.10,000/- Dena Bank |
| 05. | श्री.गणेश राधाकिसन इंगळे | 6000/- | मनपा पा.क्र.14643 रू.10,000/- |
| 06. | मे.श्रध्दापुजा सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था | Not To Open | अनामत रक्कमेचा डी.डी. नसल्याने निविदा उघडण्यात आली नाही. |

उपरोक्त सदर वाहनतळा करीता एकूण सहा निविदा प्राप्त झालेल्या असून यापैकी पाच निविदेचा तुलनात्मक दराचा तक्ता पाहता सर्वात जास्त दराची निविदा रक्कम रू.36,770/- प्रतिमाह असून निविदा श्री.संतोष अनंतराव जगताप यांची आहे.

करीता त्यांची निविदा मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. मान्यता झाल्यास संबंधीताकडून करारनामा करून घेवुन कार्यादेश देण्यात येईल.

श्री.गजानन बारवाल :पार्कींगची जागा निश्चित केली का? कुठे गाडी उभी केल्यास पैसे घेणार धोरण ठरविले का ?

मा.सभापती :विषय स्थगित ठेवून माहिती घेतली जाईल. पुढील सभेत घेण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव तुर्त स्थगीत ठेवण्यांत येऊन पुढील बैठकीत घेण्यात येईल,असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 28 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, शासकीय कर्करोग रूग्णालय, औरंगाबाद यांना पाणी पुरवठा करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या ज्युब्लीपार्क जलकुंभ येथून 200 व 150 मी.मी. व्यासाची डी.आय.के.-7 जलवाहीनी टाकण्याच्या कामास रक्कम रूपये 45,16,605/- किमंतीच्या प्रस्तावाला वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत निर्गमीत शासन निर्णय दिनांक 03/06/2015 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर रक्कमेचा भरणा महानगरपालिकेकडे करावा म्हणजे Full Deposit Work अंतर्गत जलवाहीनी टाकण्याच्या कामाची कार्यवाही करण्यात येईल असे महानगरपालिकेने कार्यालयीन पत्र क्र. जा.क्र./मनपा/उअ/पापु/जास्था/781/ 2015, दिनांक 03/01/2015 अन्वये मा.अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रूग्णालय, औरंगाबाद यांना कळविले आहे. मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल जनहित याचिका क्र.86/2011 च्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. मा.अधिष्ठाता यांनी दिनांक 09/10/2015 रोजीच्या पत्रान्वये रक्कम रूपये 45,16,605/- चा धनादेश महानगरपालिकेकडे जमा केला आहे. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदरील काम तीन महिन्याच्या आत पूर्ण करावयाचे आहे.

दिनांक 24/02/2014 रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समिती सभेने विषय क्र.195 अन्वये रक्कम रूपये 31,15,702/- किंमतीच्या अंदाजपत्रकाला यापूर्वी मान्यता दिली होती. तथापी आता सदर कामाची

किंमत रूपये 45,16,605/- इतकी झाल्यामुळे पुन्हा रक्कम रूपये 45,16,605/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभे समोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासकीय कर्करोग रूग्णालय, औरंगाबाद यांना पाणी पुरवठा करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या ज्युब्लीपार्क जलकुंभ येथून 200 व 150 मी.मी. व्यासाची डी.आय.के.-7 जलवाहीनी टाकण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या वाढीव कामाच्या रक्कम रूपये 45,16,605/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 29 :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत एकूण 137 बालवाड्या शहरातील विविध भागात चालविल्या जातात. सर्व बालवाडी वर्गाचे एकूण 2600 विद्यार्थी आहेत, हे विद्यार्थी साधारणपणे कमी उत्पन्न गटातील पालकांचे असतात. यांचा वयोगट 3 ते 6 वर्षे असतो. ह्या वयोगटातील मुलांच्या शारीरिक व बौध्दीक विकासासाठी सकस आहारांची अत्यंत आवश्यकता असते. तो त्यांना न मिळाल्यास ह्या वयात कुपोषण होऊन त्यांचा शारीरिक व बौध्दीक विकास खुंटला जातो. त्यानंतरच्या वयात तो भरून निघणे अवघड असते. याबाबीचा विचार करून महानगरपालिकेतील बालवाडीतील मुलांना "पोषण आहार" चालू करणे गरजेचे वाटते.

1 ली ते 7 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शासनाच्या शालेय पोषण आहार योजनेचा फायदा मिळतो पण बालवाडीसाठी सध्यातरी कुठलीही योजना नाही. काही मनपाच्या शालेय इमारतीत बालवाडीचे वर्ग चालतात तेथील बालवाडीच्या विद्यार्थ्यांना शाळेतील अनुपस्थित विद्यार्थ्यांचा उरलेला आहार दिला जातो, तो नेहमी पुरेसा नसतो. ज्या बालवाड्यात शालेय इमारतीच्या बाहेर म्हणजे विविध स्लम भागात आहे, त्यांना कुठलाही पोषण आहार मिळत नाही. अशाप्रकारे पोषण आहार तफावत आहे. ती तशी न राहता सर्वांना पुरेसा व त्यांच्या हक्काचा आहार मिळाला पाहिजे यासाठी महानगरपालिकेच्या 1 ली ते 7 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार हा इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन, मुंबई यांच्यामार्फत देण्यात येतो. तो अत्यंत चांगला, स्वच्छ व गरम असा असतो. याच धर्तीवर इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशनचा पोषण आहार बालवाड्यांसाठी मागील दोन वर्षापासून देण्यात येत आहे. पोषण आहाराचा दर्जा चांगला असल्याकारणाने सन 2015-16 या शैक्षणिक वर्षासाठी पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी इस्कॉन फूड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेस मुदतवाढ देण्यासंबंधी प्रस्तावित करण्यात येत आहे.

बालवाडी पोषण आहारास लागणारे साहित्य (तांदुळ, दाळ, भाज्या, तुप, मसाला इत्यादी) उपलब्ध करून घेणे, तो शिजवणे, तो बालवाडीपर्यंत पोहचवणे अशी संपूर्ण जबाबदारी ही इस्कॉन फूड रिलीफ फाऊंडेशनची असेल. ह्या संपूर्ण जबाबदारीसाठी महानगरपालिकेने रू.6.20 पै./प्रती दिन/ प्रती लाभार्थी असे दर ठरविले आहेत.

त्याप्रमाणे 2600 विद्यार्थी x रू.6.20 = **रू.16,120/-** प्रति दिन यानुसार एकूण वर्षभरात अंदाजे 210 कार्य दिवस (सुट्यांचे दिवस वगळता) पोषण आहार द्यावा लागतो. म्हणजेच 210 x 16,120 = **रू.33,85,200/-** एवढा अंदाजित खर्च संपूर्ण वर्षासाठी येईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 66 (1)(3) मध्ये महानगरपालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार तरतूद करता येईल, अशा बाबीमध्ये शाळकरी मुलांसाठी दुधाची तरतुद करणे याबाबीचा समावेश आहे.

बालवाड्यांतील विद्यार्थ्यांचा वयोगट 3 ते 6 वर्ष असा आहे. त्यांना जरूरी उष्मांक मिळण्यासाठी पुरक आहाराची गरज आहे. त्यामुळे दुधा ऐवजी मनपा बालवाडीच्या विद्यार्थ्यांना पोषण आहार देणे बाबत मा.सर्वसाधारण सभा दि.18/10/2012 ठराव क्र.906 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 संविदा प्रकरण 5 चे 2/(2) नुसार सन 2015-16 या शैक्षणिक वर्षासाठी बालवाडी पोषण आहार योजनेस लागणारा एकुण खर्च रू.33,85,200/- (अंदाजित) खर्चाच्या मान्यतेस्तव सादर. तसेच सदर पोषण आहार हा इस्कॉन फूड फाऊंडेशन या संस्थेमार्फत पुरविणेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त :शिक्षणाधिकारी रजेवर आहे. 1 ते 7 वीच्या विदयार्थ्यांना सकस आहार इस्कॉन फूड फाऊंडेशन या संस्थेच्या माध्यमातून देतो. याप्रमाणेच बालवाडीतील विदयार्थ्यांना पोषण आहार देण्याची योजना आहे.2600 विदयार्थी आहे एका मुलास 6.20 रू. खर्च येतो 210 दिवस पोषण आहार दयावा लागतो त्यासाठी 33.85 लक्ष खर्च अपेक्षीत आहे.यामुळे व विदयार्थ्यांची उपस्थितीही वाढेल प्रस्ताव मंजूर करावा.

मा.सभापती : पुरवठा धारक यांना ताबडतोब पेमेंन्ट अदा करण्या बाबत कार्यवाही करावी हा विषय मंजूर आजची सभा तहकूब करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत एकूण 137 बालवाड्या शहरातील विविध भागात चालविल्या जात असून सर्व बालवाडी वर्गातील एकूण 2600 विद्यार्थी हे कमी उत्पन्न गटातील पालकांचे असून त्यांचा यांचा वयोगट 3 ते 6 वर्षे असल्यामुळे, महानगरपालिकेतील बालवाडीतील मुलांना "पोषण आहार" उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यांत येते. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 संविदा प्रकरण 5 चे 2/(2) नुसार सन 2015-16 या शैक्षणिक वर्षासाठी बालवाडी पोषण आहार योजनेस लागणारा एकुण र.रू.33,85,200/- (अंदाजित) खर्चास तसेच सदर पोषण आहार हा इस्कॉन फूड फाऊंडेशन या संस्थेमार्फत पुरविणेसाठी सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर आजची सभा तहकूब केल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद